**मराठवाडा विभागात १७ सप्टेंबर हा दिवस मुक्ति संग्राम दिवस म्हणून कायम स्वरुपी साजरा करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०००/प्रक्र२७६/स्वासैक-१,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,**
**दिनांक : ४/५/२००१**

**शासन निर्णय :-**

राज्यातील मराठवाडा हा भाग "हैद्राबाद पोलीस कारवाईने " निजामाच्या राजवटीपासून १७ सप्टेंबर, १९४८ रोजी मुक्त करण्यात आला. यासाठी त्या भागातील स्वातंत्र्य सैनिकांनी फार मोठा लढा दिला. हा लढा "हैद्राबाद मुक्ती संग्राम" म्हणून ओळखला जातो. पोलीस कारवाईनंतर निजाम राजवटीअंतर्गत असलेले मराठवाड्यातील सात जिल्हे ( सध्याचे आठ जिल्हे ) आता महाराष्ट्र राज्याचे भाग बनले आहेत.

२. १७ सप्टेंबर १९९८ रोजी या लढयास ५० वर्षे पूर्ण झाल्याने हा दिवस "हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा सुवर्ण महोत्सवी दिवस" म्हणून मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये साजरा कण्यात आला तेव्हापासून दरवर्षी या दिवशी मराठवाडा मुक्ती दिन साजरा करण्यात येतो. प्रत्येक वर्षी या दिवशी मराठवाड्यात "सार्वजनिक सुट्टी " जाहिर करण्यात आलेली आहे.

१७ सप्टेंबर हा दिवस "मराठवाडा मुक्ती संग्राम दिन" म्हणून मराठवाड्यामध्ये कायम स्वरुपी साजरा करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. यासंदर्भात शासन आता असे आदेश देत आहे की, निजामी राजवटीतून मराठवाडा विभाग दि.१७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्त झाला . त्या घटनेच्या स्मृतिप्रित्यर्थ यानंतर प्रत्येक वर्षी १७ सप्टेंबर हा दिवस "मराठवाडा मुक्ति संग्राम दिन" म्हणून मराठवाडा विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये कायम स्वरुपी साजरा करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशावरुन व नावाने.

( शं.वि.नलावडे )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,

कृ. मा. प.

सर्व प्रधान सचिव/सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई( २ प्रती)
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालयं अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई,
पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई,
केंद्र संचालक, आकाशवाणी, औरंगाबाद,
विभागीय आयुक्त औरंगाबाद,
पोलीस आयुक्त औरंगाबाद,
महापालिका आयुक्त औरंगाबाद,
सर्व पोलीस उप महानिरिक्षक,
महा समादेशक नगर सेना, मुंबई,
जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड परभणी, लातूर, बीड, उस्मानाबाद, हिंगोली,
इतर सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस अधिक्षक,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
संचालक, सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र राज्य मुंबई,
सभापती, महाराष्ट्र विधान परिषद,/ उप सभापती महाराष्ट्र विधान परिषद याचे खाजगी सचिव,
अध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/ उपाध्यक्ष महाराष्ट्र विधान परिषद याचे खाजगी सचिव,
विरोधी पक्ष नेते विधान परिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्र्यांचे आणि राज्यमंत्र्याचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई,
उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मंत्री राजशिष्टाचार यांचे खाजगी सचिव,
राज्यमंत्री, राजशिष्टाचार यांचे खाजगी सचिव